# पोलीस अधीक्षक कार्यालय, सांगली

सांगली -मिरज रोड, विश्रामबाग, सांगली - ४१६ ४१५

फोन नं.- ०२३३ २६७२३२३ फॅक्स नं. – ०२३३ - २६७२१००

E Mail- sp.sangli@mahapolice.gov.in


क्रमांक-पशा-५/नो- पार्कींग झोन जाहिरनामा/२०२६ /8394 सांगली दि.17 /०६/२०२६

## जाहिरनामा-

मी, तुषार दोशी, पोलीस अधीक्षक, सांगली महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३३ पोट कलम १ (ब) रहदारी अधिकारान्वये सांगली-मिरज-कुपवाड म.न.पा क्षेत्रातील वाहतुक व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी महात्मा गांधी चौक हा मिरज शहरातील मुख्य रहदारीचा चौक व चौकाचे चारही बाजूस प्रायोगिक तत्त्वावर ३० दिवसांच्या कालावधी करिता ५० मीटर नो-पार्कींग झोन करण्यात येत आहे. याची सर्व नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

- **महात्मा गांधी चौक येथील नो - पार्कींग झोन खालील प्रमाणे:-**

१. महात्मा गांधी चौक ते पंढरपुर रोडकडे जाणारे वायव्य व ईशान्य बाजुचा कॉर्नर ( जोशी पेट्रोल पंप कॉर्नर)

२. महात्मा गांधी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याकडे जाणारे रोडचे ईशान्य वाजुचा कॉर्नर महानगर पालिकेच्या गाळ्यांसमोर ( मयुर चहा व स्वयंम वडापाव सेंटर समोर )

३. बॉम्बे बेकरी, कॉर्नर ते महात्मा गांधी चौक जाणारे रोडवर आग्नेय बाजुचा कॉर्नर (स्टेश चौकाकडे जाणारे रोडवर) ( न्यु बॉम्बे रेस्टॉरंट समोर)

४. स्टेशन चौक ते महात्मा गांधी चौक जाणारे रोडवर नैऋत्य बाजुचा कॉर्नर ( साई सेवा मेडीकल समोर शेतकरी दुध, व्हीओ केअर,गजानन भोजनाल यासमोर )

५. महात्मा गांधी चौक ते सांगली जाणारे रोडवर दक्षिण बाजुस नैऋत्य बाजुचा कॉर्नर (श्रद्धा व जे.के.मेडीकल, स्वामी आणि कंपनी वॉच समोर)

उपरोक्त प्रमाणे महात्मा गांधी चौक येथील वरील ठिकाणी कामानिमित्त येणारे वाहनांसाठी महात्मा गांधी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक जाणारे रोडवर ५० मीटर अंतर सोडून रस्त्याचे दोन्ही बाजूस दुचाकी पार्किंगची सुविधा करण्यात आलेली आहे. सदरचा जाहिरनामा दि.१७/०६/२०२६ ते दि.१६/०७/२०२६ पर्यंत ३० दिवसांकरिता प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येत आहे. याची सर्व नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

तरी नागरिक रहिवाशी, मोटार वाहन चालकांनी व जनतेने नमूद बदल केलेल्या वाहतुक नियोजनास सहकार्य करावे. तसेच आपल्या हरकती, सचना सहाय्यक पोलीस निरीक्षक वाहतुक नियंत्रण शाखा मिरज अथवा पोलीस अधीक्षक कार्यालय विश्रामबाग सांगली यांच्याकडे स्वरुपात पाठवाव्यात जेणेकरुन प्राप्त झालेल्या सुचनांचे अवलोकन केल्यानंतर वाहतुक नियोजनात योग्य ते बदल करणेत येतील.

( तुषार दोशी )
पोलीस अधीक्षक, सांगली.

Scanned with OKEN Scanner